दैनिक गोदातीर दि. 24/05/2024

# गोवंशाने भरलेला ट्रक सिनेस्टाईल पकडला

▶ ट्रकसह अकरा लाख वीस हजार रुपयांचा ऐवज जप्त

▶ २२ पैकी तीन जनावरांचा मृत्यू; १९ जनावरे गोशाळेत दाखल

**अर्धापूर–** गोवंशाची वाहतूक करणारा ट्रक पोलीसांनी थांबण्याचा इशारा करूनही थांबला नाही. त्यामुळे पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करीत ट्रकसमोर जीप आडवी लावून ट्रक पकडला. पण ट्रकमधील चालक व अन्य एक ऊसाच्या शेतात पळून गेले. ट्रकमधील २२ जनावरांपैकी ३ जनावरे दगावली असून १९ जनावरे गोशाळेत दाखल करण्यात आली आहेत.

अर्धापूर पोलीस दि.२३ गुरूवारी रोजी सकाळी सहा वाजता जीपमधून पेट्रोलिंग करीत होते. दरम्यान, बारसगाव पाटी जवळ ट्रकचा (एम.एच.४०–बी. एल.३७६२) संशय आल्याने ट्रक बाजूला घेण्याचा इशारा केला असता चालकाने ट्रक बाजूला न घेता पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून भोकर रोडवरील माऊली पेट्रोल पंपाजवळ ट्रकच्या समोर जीप आडवी लावली. पण ट्रक चालक व इतर एकाने उसाच्या शेतात पळून गेले.

ट्रकमध्ये क्रूरतेने व निर्दयपणे कोंबण्यात आले होते. त्यात तीन बैल मृतावस्थेत आढळून आली. तर १९ जनावरे गोशाळेत सोडण्यात आली आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नांदेड, अप्पर पोलीस अधीक्षक भोकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड ग्रामीण, पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख, पोलीस नाईक महिंद्रा डांगे, विजय कदम यांनी केली आहे. पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख यांच्या फिर्यादीवरून ट्रक चालक व एतर एका विरुद्ध भादवी कलम २७९,४२८,४२९ व पशुसंरक्षण अधिनियम १९७६ चे कलम सहा प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियमन १९६० चे कलम ११ (१),(डी)(ई) व सह प्राण्यांचे परिवहन नियम १९७८ चे कलम ४७ (ए), ४८, ५०,५६,(सी), व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११९ व मोटार वाहन अधिनियम कलम १८४,१३४,१८७,१२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ जनावरे किंमत ४ लाख २० हजार रुपये, ट्रक किंमत अंदाजे सात लाख रूपये असा एकूण ११ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

### मिल्लतनगर भागातून दहा गोवंश जप्त

नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पथक आपल्या हद्दीत २१ मेच्या रात्री गस्त घालत असताना त्यांना मिळालेल्या माहितीवरून मीठ कारखान्यासमोर एक पिकप वाहन क्रमांक (एमएच२६–बीई– ५३ २२) मध्ये अवैध कत्तलीसाठी गोवंश जात असल्याचे समजले. यावेळी पोलिसांनी सदर वाहन थांबवून तपासणी केली असता त्यात दहा गोवंश जवळपास एक लाख ८३ हजार रुपयांचे जप्त केले. यावेळी पोलिसांनी शेख साहेद शेख महेमूद (वय २१ चालक), अब्दुल रजाक मौला कुरेशी आणि खरेदी करणारा व विक्री करणाऱ्याविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात पोलीस अंमलदार माधव माने यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार तेलंगे करत आहेत.

दैनिक पुण्यनगरी 24/05/2024

# गोवंशाची वाहतूक करणाऱ्या ट्रकवर कार्यवाही

## ट्रक व गोवंशासह ११ लाख २० हजारांचा ऐवज जप्त

**नांदेड/प्रतिनिधी**

अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत भोकर पोलीस पेट्रोलिंग करीत असताना दि.२३ मे रोजी सकाळी ६ वाजता एम.एच.४० बी.एल.३७६२ क्रमांकाचा ट्रकमध्ये सुमारे ४ लाख २० हजार रुपये किंमतीच्या गोवंशाची तस्करी करीत असताना मिळून आले. या प्रकरणी गोवंशासह ट्रक असा एकुण ११ लाख २० हजारांचा ऐवज पोलिसांनी जप्त केले.

अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपर पोलीस अधीक्षक खंडेराय धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्या आदेशावरुन पोलीस उपनिरीक्षक आयुब शेख आपल्या सहकाऱ्यांसोबत पेट्रोलिंग करीत असताना दि.२३ मे रोजी सकाळी ६ वाजता भोकर फाटा ते भोकरकडे जाणाऱ्या रस्त्यावर एम.एच.४० बी.एल.३७६२ या क्रमांकाचा संशयीत ट्रक जाताना दिसून आला. पोलिसांनी या वाहनास थांबण्याचा इशारा केला असता ट्रक थांबला नाही. पोलिसांनी पाठलाग करुन बारसगाव शिवारातील माऊली पेट्रोलपंपाजवळ भोकर रोडवर ओव्हर टेक करुन ट्रकला थांबविले. ट्रक चालक व सोबतचा एक इसम पळून गेला. या ट्रकची तपासणी केली असता त्यात गोवंश मिळून आले.

ट्रक क्रमांक एम.एच.४० बी.एल.३७६२ ची पहाणी केली असता ट्रकमध्ये गोवंश क्रुरतेने व वेदना होतील अशा पद्धतीने कोंबून वाहतूक करीत असल्याचे दिसून आले. ट्रकमध्ये २२ गोवंश आढळले.

ज्यामध्ये ३ बैल मयत अवस्थेत व १७ बैल व २ गोरे असे एकूण ४ लाख २० हजार रुपयांचे गोवंश व ७ लाख रुपये किंमतीचा ट्रक असा एकूण ११ लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चालक, मालक व इतर एका आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम, पोलीस उपनिरीक्षक अय्युब शेख, जमादार कंदम, डांगे यांनी सांगितले.